


दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

**1,22,570**
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक



● वर्ष : ०२ ● अंक : ०५७ ● पुणे ● गुरुवार, दि. ०९ जानेवारी २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313



नऱ्हे-गोकुळनगर मानाजी नगर परिसरातील... 3



काम करणाऱ्या महिलांसाठी पुणे... 4

## ठळक बातम्या

### पाच शहरांत पुण्याला स्थान

**पुणे : (आरंभ पर्व) :** देशात काम करणाऱ्या महिलांसाठी सर्वोत्कृष्ट ठरलेल्या शहरांची यादी जाहीर करण्यात आली असून, त्यात पुण्याने पहिल्या पाचांत स्थान पटकाविले आहे. अवतार ग्रुपने केलेल्या या सर्वेक्षणात बेंगळुरु पहिल्या स्थानी असून, मुंबई तिसऱ्या स्थानी आहे. मनुष्यबळ सल्लागार क्षेत्रातील अवतार ग्रुपने 'महिलांसाठी भारतातील सर्वोत्कृष्ट शहरे' सर्वेक्षणाचे निकाल जाहीर केले. महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी आणि राज्यातील दुसरे सर्वांत मोठे शहर असलेल्या पुण्याला या सर्वेक्षणात पाचवे स्थान मिळाले आहे. काम करणाऱ्या महिलांच्या दृष्टीने सर्वाधिक समावेशक, सुरक्षित, संवेदनक्षम आणि शाश्वत शहर या निकषांच्या आधारे सर्वोत्कृष्ट शहरे जाहीर करण्यात आली आहेत. काम करणाऱ्या महिलांसाठी सरकारी संस्थांची कार्यक्षमता आणि जीवनाची गुणवत्ता यासाठी उच्च मानांकन मिळवून पुण्याने या सर्वेक्षणात पाचवे स्थान मिळविले आहे. या सर्वेक्षणात आदर्श शहरे आणि सर्वोत्तम पद्धती निश्चित केल्या जातात. तसेच त्यात शहरांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी संस्था, धोरणकर्ते आणि व्यक्तींसाठी एक संधी उपलब्ध करून दिली जाते. 'अवतार'च्या प्राथमिक संशोधनासोबतच सेंटर फॉर मॉनिटरिंग द इंडियन इकॉनॉमी (सीएमआयई), जागतिक बँक, गुन्ह्यांच्या नोंदी आणि नियमित श्रमशक्ती सर्वेक्षणासह विविध विदा स्रोतांना एकत्र करून हा निर्देशांक संकलित केला जातो. 'अवतार'च्या संशोधनात लक्ष्याधारित समूह चर्चा आणि देशव्यापी सर्वेक्षणाचा समावेश आहे.

# आकाकडे पुण्यात किती संपत्ती?

## मगरपट्टा ते एफसी रोड, सुरेश धसांनी सांगितलेल्या आकड्यानं खळबळ

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचं अपहरण करून त्यांची हत्या करण्यात आली. या घटनेनं राज्यभरात खळबळ उडाली. हे प्रकरण आता चांगलंच तापलं आहे. या प्रकरणावरून राजकीय आरोप-प्रत्यारोप सुरू झाल्याचं पाहायला मिळत आहे. या प्रकरणात मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची देखील मागणी होत आहे. दरम्यान संतोष देशमुख यांच्या कुटुंबाला न्याय मिळावा, संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणातील आरोपींना फाशी व्हावी यासाठी राज्यभरात आक्रोश मोर्चे काढले जात आहेत. आज पैठणमध्ये आक्रोश मोर्चा



काढण्यात आला. या मोर्चामध्ये बोलताना सुरेश धस यांनी पुन्हा एकदा जोरदार हल्लाबोल केला आहे. आकांनी भरपूर माल जमावला आहे, आका आंबानींना मागे टाकतात की काय अशी मला शंका आहे. आकांकडे काम करणाऱ्या अनेकांच्या नावावर जमिनी आहेत. पुण्यातील मगरपट्ट्यात आकांनी एक अख्खा फ्लोअर विकत घेतला आहे. ज्याची किंमत मार्केटमध्ये 75 कोटी रुपये इतकी आहे, हा फ्लोअर आकाच्या चालकाच्या नावावर आहे, असा दावा सुरेश धस यांनी केला आहे.

पुढे बोलताना ते म्हणाले की मी याबाबत सर्व माहिती बिल्डरकडून मिळवली आहे. पुण्याच्या एफसीरोडवर आकाने सात दुकानं बुक केली आहेत, ज्या एका दुकानाची किंमत पाच कोटी रुपये आहे. आका शंभर टक्के 302 चा आरोपी आहे, परळीत एका वर्षात तब्बल 109 मृतदेह सापडले, त्यातील अनेक मृतदेहाची ओळख पटलेली नाहीये, आकाने मोठ्या आकाला जर फोन केला असेल तर त्याचाही नंबर येईल असंही यावेळी सुरेश धस यांनी म्हटलं आहे.

संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणात आतापर्यंत सहा आरोपींना अटक करण्यात आली आहे, मात्र एक आरोपी अजूनही फरार आहे. आरोपींना फाशीची शिक्षा व्हावी या मागणीसाठी राज्यभरात मोर्चे काढले जात आहेत. आज पैठणमध्ये आक्रोश मोर्चा काढण्यात आला. दरम्यान दोन दिवसांपूर्वी संतोष देशमुख यांचा भाऊ धनंजय देशमुख यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली.

> आर्थिक गैरव्यवहार असल्यावर ईडीची कारवाई होते. परंतु वाल्मिक कराडवर कारवाई का झाली नाही. तसेच त्याच्यावर अनेक गुन्हे दाखल असताना परळीच्या लाडकी बहीण योजनेचे अध्यक्षपद त्याला दिले. गुन्हा दाखल असताना त्याला या महत्वाच्या योजनेचे अध्यक्ष का केले, असा सवाल सुप्रिया सुळे यांनी विचारला आहे. वाल्मिक कराडसोबत मंत्री धनंजय मुंडे यांचे व्यावसायिक व्यवहार आहेत. मग त्यांच्यावर कारवाई व्हावी का असा प्रश्न सुप्रिया सुळे यांना विचारण्यात आला. त्यावर त्याचे उत्तर सरकारकडे मागा. मी सरकारमध्ये नाही, असे खासदार सुळे यांनी सांगितले.

## पुण्यात पुन्हा कोयता गँग सक्रिय, तरुणाच्या हाताचा पंजा केला वेगळा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
तीन ते चार दिवसांपूर्वीच पुण्यामध्ये सोशल मीडियावर कोयता हातामध्ये घेऊन फोटो पोस्ट केल्याची घटना ताजी असतानाच आता पुन्हा पुन्हा पुण्यात एक नवीन घटना समोर आलेली आहे. पुण्यातील या कोयता गँग ने पुन्हा राडा करायची संधी सोडली नाहीये.

या कोयता गँगने तरुणाच्या हाताचा पंजा वेगळा केलेला आहे. हि घटना बिबवेवाडीमध्येघडली आहे. कोयता यांच्या टोळीने तरुणावर जीवा हल्ला केला आहे. या घटनेमुळे पुण्यात एकच खळबळ उडालेली आहे. या घटने प्रकरणी पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतलेले आहे.



कोयता गँग ने केलेल्या हल्ल्यामुळे या तरुणाला आपल्या हाताचा पंजा गमवा लागलेला आहे. या घटने प्रकरणी या तरुणाने बिबवेवाडी पोलीस ठाण्यामध्ये तक्रार नोंदवली आहे. या हल्ल्यामध्ये पीयूष पाचकुडवे हा तरुण गंभीर जखमी झाला आहे. याप्रकरणात सागर सरोज आणि त्याच्या इतर साथीदारांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून बिबवेवाडी पोलिसांनी याप्रकरणी एका अल्पवयीन तरुणासह 2 जणांना ताब्यात घेतले आहे.

हा सगळा प्रकार सोमवारी चारच्या दरम्यान घडला. तक्रार आणि त्याचा मित्र पियुष यांना आरोपीकडून भेटायला बोलावले गेले होते. पूर्वी यांच्यामध्ये काहीतरी वाद झाले होते आणि म्हणूनच या वादाचा बदला घेण्याकरिताच आरोपीने या दोघांना बोलावले होते, अशावेळी पियुष च्या हातावर आरोपीने कोयता मारला आणि कोयता मारल्यामुळेच पियुषचा हात पंजा पूर्णपणे वेगळा झाला.

या जीवघेण्या हल्ल्यामध्ये पियुष गंभीर जखमी झालेला आहे. पियुषला त्वरित पुण्यातील ससून हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आलेले आहे तसेच डॉक्टर शस्त्रक्रिया करून पियुषचा हात जोडण्याचा प्रयत्न देखील करत आहे परंतु घडलेली ही घटना अत्यंत गंभीर आहे म्हणूनच आरोपीला त्वरित अटक केले गेलेले आहे. या घटने अंतर्गत दोन जणांवर अमानुष मानवी हत्या हल्ला केल्याप्रकरणी अटक करण्यात आलेली आहे.




# अर्धवट जळालेल्या मृतदेहाचे तुकडे कुत्र्यांनी खाल्ले

## वैकुंठ स्मशानभूमीतील भयंकर प्रकार; पालिकेला दिसले पावाचे तुकडे

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
पुण्यातील नवी पेठ परिसरातील वैकुंठ स्मशानभूमीत मानवी मृतदेहाचे तुकडे भटक्या कुत्र्यांनी पळवून खाल्ल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. ही स्मशानभूमी पुणे शहरातील मध्यवर्ती भागात आहे. शहरातील ही मोठी स्मशानभूमी असून येथे मृत व्यक्तींवर अंत्यसंस्कार करून देहाला अग्नि दिली जातो. मृतदेह अर्धवट अवस्थेत जळाल्याचा प्रकार घडल्याने मृतदेहाचे तुकडे भटक्या कुत्र्यांनी पळवून खाल्ल्याचा धक्कादायक प्रकार समोर आल्याने खळबळ उडाली आहे. ही माहिती महापालिकेचे माजी स्वीकृत सदस्य अभिजीत बारवकर यांनी दिली.

हा प्रकार बुधवारी (दि.8) घडला. या घटनेचे व्हिडिओ आणि फोटो धक्कादायक असून व्हायरल झाले आहेत. भटकी कुत्री प्रत्यक्षात अर्धे जळालेले मानवी मृत देहाचे तुकडे खात असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे.

वैकुंठ स्मशान भूमीत झालेल्या या प्रकारानंतर पुणेकरांकडून संताप व्यक्त करण्यात येत आहे. या प्रकरणी



बारवकर यांनी महापालिकेकडे तक्रार केली आहे. परंतु आरोग्य विभागाला आणि विद्युत विभागाला शरीराचे तुकडे नव्हे तर नारळ आणि पावसाचे तुकडे दिसत आहेत. त्यामुळे झालेल्या या प्रकारावर पडदा टाकावा, असे संबंधित अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. स्मशानभूमित असा कोणताही प्रकार झालेला नाही. असे सांगून अधिकाऱ्यांनी हात वर करण्यास सुरुवात केली आहे.

पुणे महापालिकेने निकिता बॉयलर या कंपनीला अंत्यसंस्काराचे कंत्राट दिले आहे. या निकिता बॉयलरविरोधात अभिजीत बारावकर यांनी तक्रार दिली आहे. अभिजीत बारावकर म्हणाले की, "माझा एक मित्र वैकुंठ स्मशानभूमीला त्याच्या मित्राच्या अस्थी संकलन विधीसाठी गेला होता.

त्यावेळी त्याच्या लक्षात आले की कुत्रे अर्धवट जळालेल्या मानवी मृत देहाचे तुकडे खात आहेत. कुत्र्यांना रोखण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांनी ते तुकडे पळवून नेले. पण त्याच दरम्यान मित्राने व्हिडीओ आणि फोटो काढले. त्यामध्ये हा प्रकार स्पष्टपणे दिसून येत आहे. याप्रकरणी महापालिका आयुक्त, सुरक्षा प्रमुख, विद्युत विभागाचे मुख्य अभियंता यांच्यासह अधिकाऱ्यांना पत्र लिहून कंपनीवर तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे.

बारावकर म्हणाले, "अंत्यसंस्काराचे कंत्राट निकिता बॉयलरला देण्यात आले आहे. अंत्यसंस्कार पूर्णत्वास नेण्याची जबाबदारी कंत्राटदाराची आहे. परंतु त्यांच्याकडून साधे लक्षही ठेवले जात नाही. कुत्र्यांना माणसाचे मांस खाण्याची सवय लागली तर ते अधिक भीतीदायक आहे. भविष्यात अंत्यसंस्कारासाठी येणाऱ्या लोकांवर हल्ला होण्याची शक्यता नाकारता येत नाही."

बारावकर म्हणाले, "महापालिका कंत्राटदाराची बाजू घेत आहे. लोक अंत्यसंस्कारासाठी नारळ का घेऊन जातील. अंत्यसंस्कार करताना कोणी नारळ वापरताना मी पाहिलेले नाही. निकिता बॉयलरचे कामगार अंत्यसंस्काराची काळजी घेत नाहीत हे स्पष्ट आहे. अर्ध्या जळालेल्या मृतदेहांकडे त्यांनी दुर्लक्ष केले आहे. त्यामुळेच भटक्या कुत्र्यांनी मृतदेहाचे तुकडे खाल्ले."

प्रत्यक्षदर्शींच्या म्हणण्यानुसार, भटक्या कुत्र्यांनी स्मशानभूमीतून अर्धे जळालेले मानवी अवशेष बाहेर काढून खाल्ले होते. या घटनेमुळे स्थानिकांमध्ये संतापाचे वातावरण पसरले असून, या प्रकाराला जबाबदार असलेल्यांवर कारवाईची मागणी केली आहे.

> वैकुंठ स्मशानभूमीत झालेला प्रकाराबद्दल गैरसमज पसरवला जात आहे. भटक्या कुत्र्यांनी उचलेले तुकडे हे मानवी मृत देहाचे नाहीत. नारळ अथवा पावाचे आहेत. ज्यांनी ही तक्रार महापालिकेकडे केली आहे, त्यांच्याशी आम्ही बोललो असून असा प्रकार घडला नसल्याचे सांगण्यात आले आहे. त्यामुळे विनाकारण अशी चर्चा पसरवू नये.
> - मनिषा शेकटकर, मुख्य अभियंता विद्युत विभाग, पुणे महापालिका.





# दिल आया गधी पे, तो परी क्या चीज है



आपल्यावर आलेल्या परिस्थितीसाठी सासरच्यांना, माहेरच्यांना, इतरांना कोणालाही दोष देऊन वाद घालत बसू नका. ज्या घरात पती पत्नीला विचारत नसतो तिथे कोणीच तिची किंमत करत नाही. त्यामुळे उगाच याला, त्याला आपलं दुःख सांगून, रडून सहानुभूती पण मिळवू नका. लोकं तुम्हाला मार्गदर्शन करण्यापेक्षा किंवा तुमची समस्या सोडवण्यापेक्षा तुम्ही कुठे चुकलात, कशा चुकलात, तुमचंच कसं सगळं वागणं उलट आहे, तुम्हाला नांदता येत नाही हे शिकवतील. तुमचीच बदनामी करण्यासाठी, तुम्हाला दोष देण्यासाठी तुमचेच कुटुंब आघाडीवर असेल. आपल्या भावनांचे प्रदर्शन करून प्रेमाची, आपलेपणाची भीक कोणाकडे मागत बसू नका. जोपर्यंत नवऱ्याचे अनैतिक संबंध घराबाहेर आहेत तोपर्यंत तुम्हाला त्याला सावरण्याचा, संसार वाचवण्याचा, नवऱ्याला सुधारण्याचा, स्वतःला बदलण्याचा जितका प्रयत्न करता येईल तितका नक्की करा. समुपदेशन दरम्यान काही प्रकरणं अशीही येतात ज्या ठिकाणी नवऱ्याने बाहेर बाई ठेवली किंवा घरात आणून बाई ठेवली आहे. यावेळी मात्र महिलांचा संयम पूर्ण गेलेला असतो आणि आता कठोर कायदेशीर काय प्रक्रिया करायची? इतकं डोक्यावरून पाणी गेल्यावर कोणतीही महिला ही परिस्थिती स्वीकारायला तयार नसते. कायदेशीर, पोलीस तक्रार याबद्दल मार्गदर्शन त्यांना हवं असतं. त्यामुळे विवाहित महिलांबाबतचे कायदे याबद्दल आपण वेगळ्या लेखात सविस्तर माहिती घेऊच. तरी आपल्या पतीची फक्त तात्पुरती सर्वसाधारण गुंतवणूक कुठे झाली असेल तर वेळ सर्व गोष्टी वर औषध असतं. त्यामुळे संयम ठेवा. लग्न केलेला नवरा आणि त्याच्यापासून असलेली मुलं हे नातं सर्वश्रेष्ठ आहे. नवऱ्याच्या आयुष्यात आलेल्या, असलेल्या कोणत्याही फालतू व्यक्तीमुळे हे नातं तोडू नका. तुमच्या नात्याला कायद्याचा, समाजाचा, धर्माचा आधार आहे. त्यामुळे आत्मविश्वास डळमळीत होऊ देऊ नका.

अनेक महिलांना हा त्रास होतोय की बाहेरील बाई नवऱ्याच्या आयुष्यात आल्यामुळे तो तिच्यावर खूप खर्च करतो, घरातील जबाबदाऱ्या टाळतोय, मुलांच्या आर्थिक कर्तव्यात कमी पडतोय. या ठिकाणी आपण इतकंच म्हणू शकतो की त्याने कमवलेला पैसा कुठे खर्च करायचा, हा त्याचा चॉईस आहे. त्याला तात्पुरती मजा, मस्ती करणारी, तेवढ्यापुरती साथ देणारी बाई जर खर्च करण्यासाठी प्राधान्य वाटतं असेल तर त्याची इच्छा असं मानून स्वतःच्या पायावर उभ्या राहा. स्वतःच्या कला, गुण, शिक्षण, बुद्धिमत्ता यांचा वापर करा. त्यातून पैसे कसे कमवता येतील यावर विचार करा. मुलांना सत्य परिस्थितीची जाणीव करून द्या. ते जर कमवण्याइतपत मोठे असतील तर त्यांची मदत घ्या, पण खचून जाऊ नका. जर मुलं लहान असतील तर तुम्हाला आर्थिक बाबतीत झेपेल, परवडेल असेच अभ्यासक्रम त्यांच्यासाठी निवडा. कारण खूपदा समुपदेशनाला आलेल्या केसेसमध्ये मुलांच्या शिक्षणाचा खर्च नवरा बाहेरील बाईवर होणाऱ्या खर्चामुळे करत नाही ही तक्रार असते. पती-पत्नी एकत्र राहत असो वा विभक्त विवाहबाह्य संबंध मग ते आईचे असोत की वडिलांचे हाल मात्र मुलांचे, त्यांच्या शिक्षणाचे होतात हेच पाहायला मिळते. नवऱ्याला त्याच्या आयुष्यात जे हवं ते तो करतोय त्याचं आयुष्य तो जगतोय मग आता तुम्ही ठरवा तुम्हाला, तुमच्या परिस्थितीला काय निर्णय घेणं योग्य आहे. सामाजिक बदनामी त्याची होईल, तिची होईल, लोकं त्यांना नावं ठेवतील, जे काही नुकसान, अपप्रचार, अपमान व्हायचा तो त्यांचा होईल त्यामुळे तुम्ही डाळमळीत होऊ नका. समाजात तुमचा मानसन्मान कमी होणार नाहीये त्यामुळे खचून जाऊ नका. अनेक महिलांना अशावेळी घटस्फोट घेऊन द्वितीय विवाह करायचा असतो, काहींना फक्त घटस्फोट घेऊन मुलांसोबत एकटं राहायचं असतं, काहींना त्याच घरात राहून नवऱ्याची बाहेरची बाई आणि तो यांना सरळ करायचे असते. काही महिला शांतपणे फक्त सहन करत राहतात. काही महिला स्वतः घर सोडतात, काही नवऱ्याला घराबाहेर काढतात, अशी अनेक उदाहरणं वेगवेगळ्या केसेसमध्ये पाहायला मिळतात. महिला नवऱ्यावर आर्थिक बाबतीत कितपत अवलंबून आहे, तिला सासरचे, माहेरचे पाठबळ, आधार किती आहे यावर प्रत्येकीचे निर्णय अवलंबून असतात. आपण निर्णय कोणताही घेतला तरी तो आपल्या स्वतःच्या, मुलांच्या हिताचा घ्यावा. आपल्या नवऱ्याच्या आयुष्यात कोणी एक व्यक्ती आली म्हणून आपलं, मुलांचं आयुष्य खराब करून घेऊ नये. पतीचे विवाहबाह्य संबंध सहन न झाल्यामुळे अनेक महिलांना आत्महत्याचे विचार येतात, अनेक महिला मुलांना घेऊन आत्महत्या करेल असं बोलतात. आपला जीव, आपलं जीवन इतकं स्वस्त नाही की अशा फालतू कारणास्तव ते संपवावे. त्यामुळे असा विचार पण मनात आणू नका. नवऱ्याने दुसऱ्या कोणासोबत संबंध ठेवले याचा अर्थ तुम्ही कमी आहात, तुमच्यात कमतरता आहेत, तुम्हाला संसार करता आला नाही, नवरा सांभाळता आला नाही असे काहीही नाही. त्याला त्याच्या इच्छेनुसार जे वाटले, जे आवडले, जे पटले, त्याला त्याच आयुष्य कोणासोबत घालवायचं, कितीवेळ कोणाला द्यायचा हे सर्वस्वी त्याच्यावर सोडून द्या. तुम्ही त्रागा करून, भांडण करून, वाद घालून तुमच्यातील संबंध अधिक खराब होतील पण नवरा बदलणार नाही. त्यामुळे स्वतःची मनःशांती, आरोग्य, मानसिक, भावनिक विकास, व्यक्तिमत्त्व विकास, स्वतःची स्वप्न, स्वतःच आयुष्य यासाठी जगा. आपल्यावर आलेल्या परिस्थितीसाठी सासरच्यांना, माहेरच्यांना, इतरांना कोणालाही दोष देऊन वाद घालत बसू नका.

ज्या घरात पती पत्नीला विचारत नसतो तिथे कोणीच तिची किंमत करत नसते. त्यामुळे उगाच याला त्याला आपलं दुःख सांगून, रडून सहानुभूती पण मिळवू नका. लोकं तुम्हाला मार्गदर्शन करण्यापेक्षा किंवा तुमची समस्या सोडवण्या पेक्षा तुम्ही कुठे चुकल्या, कशा चुकल्या, तुमच्यात किती समस्या आहेत, तुमचंच कसं सगळं वागणं उलट आहे, तुम्हाला नांदता येत नाही, नीट वागता येत नाही, तुमचे विचार नकारात्मक आहेत हे शिकवतील. तुमचीच बदनामी करण्यासाठी, तुम्हाला दोष देण्यासाठी तुमचेच कुटुंब, नातेवाईक, समाज आघाडीवर असेल. आपल्या भावनांचे प्रदर्शन करून प्रेमाची, आपलेपणाची भीक कोणाकडे मागत बसू नका. इथे प्रत्येकाला स्वतःचं पडलेलं असत, स्वतःचा स्वार्थ आणि स्वतःचा हट्ट पूर्ण करण्यासाठी जो तो व्यस्त असतो. त्यामुळे अशा परिस्थितीमध्ये प्रत्येकजण त्याचं काय भलं होणार आहे, यातून त्याचा काय हेतू साध्य होईल हे बघत असतो. त्यामुळे कोणाच्या मदतीची, तुम्हाला समजावून घेण्याची अपेक्षा बाळगून स्वतःला अजून दुःखी करून घेऊ नका. हार न मानता स्वतःची लढाई स्वतः लढा.

### सीग्राम्स रॉयल स्टॅग पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटरची ग्लोबल सेन्सेशन नेटफ्लिक्सच्या

# स्क्विड गेम सीझन 2 सोबत भागीदारी




**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

सीग्राम्स रॉयल स्टॅग ने नेटफ्लिक्सची विक्रमी लोकप्रिय मालिका 'स्क्विड गेम' च्या दुसऱ्या सीझनसाठी भागीदारी केली आहे. या सहयोगामुळे रॉयल स्टॅग च्या 'लाइव्ह इट लार्ज' तत्त्वज्ञानाचा समावेश सहजपणे केला गेला आहे, ज्यामुळे प्रेक्षकांना एका भव्य अनुभवाचा भाग बनण्याची संधी मिळेल. ही मालिका संपूर्ण जगभरातील कोट्यवधी प्रेक्षकांना मोहून टाकत आहे. के-ड्रामा युवकांमध्ये विशेष लोकप्रिय असल्याने, ही भागीदारी ब्रँडसाठी सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाच्या युवा प्रवृत्तीला प्रोत्साहन देण्याची संधी निर्माण करते, ज्यामुळे त्याचा आकर्षण आणि प्रासंगिकता आणखी वाढते. या सहयोगाबाबत बोलताना पर्नोड रिकार्ड इंडिया चे जनरल मॅनेजर – मार्केटिंग जॉयदीप बसुरॉय म्हणाले, "नेटफ्लिक्सच्या 'स्क्विड गेम' सोबत रॉयल स्टॅगची भागीदारी ब्रँडला युवा पिढीच्या के-कल्चरच्या क्रेझला जोडण्याची संधी देते, ज्यामुळे भावनिक संबंध वाढतो आणि ब्रँडचा युवा कल्चर उंचावतो.

रॉयल स्टॅग ब्रँड नेहमीच मोठी स्वप्ने पाहणाऱ्या आणि उत्कटतेने व उद्देशपूर्ण जीवन जगणाऱ्या लोकांसाठी उभा राहिला आहे, जे या शोच्या संकल्पनेशी जुळते. 'स्क्विड गेम' सीझन 2 सोबतची ही भागीदारी आम्हाला आमच्या प्रेक्षकांना 'लाइव्ह-इट-लार्ज' अनुभव आणि ठोस सामाजिक महत्त्व देण्याची संधी देते – अर्थात 'जनरेशन लार्ज साठी!"

ब्रँड या सहयोगाचा विविध डिजिटल प्लॅटफॉर्मवर प्रभावी वापर करत आहे, ज्यामध्ये 'स्क्विड गेम' मधील खास वैशिष्ट्ये, जसे की गूढ मुखवटे घातलेले रक्षक आणि शोची विशिष्ट चिन्हे, ठळकपणे दाखवली जात आहेत. प्रेक्षकांना www.royalstagfan.com ला भेट देऊन रॉयल स्टॅग x स्क्विड गेम ची रोमांचक गिव्हवे जिंकण्याची संधीही मिळू शकते.

## थोडक्यात



### गडदुदेवी देवस्थानकडे जाणाऱ्या रस्त्याची दुरावस्था

**राजगुरूनगर (आरंभ पर्व) :** वाडा मार्गे श्री क्षेत्र गडदुदेवी देवस्थान कडे जाणाऱ्या रस्त्याची दुरावस्था झाली असून भाविकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. प्रशासन मात्र या कडे दुर्लक्ष करत असून भाविकांच्या जीवाशी खेळत आहे. खेड तालुक्याच्या पश्चिम भागातील वाडा - शिनोली हा रस्ता श्री क्षेत्र गडदुदेवी देवस्थान कडे जाणारा मुख्य रस्ता मानला जातो. श्री क्षेत्र गडदुदेवी देवस्थानला 'क ' वर्ग देवस्थान दर्जा प्राप्त असून या ठिकाणी मोठ्या प्रमाणात भाविकांची व पर्यटकांची वर्दळ असते. हा मार्ग भौगोलिक दुष्ट्या घाटमाथ्याचा आहे. पावसाळ्यात या मार्गावर अनेकदा डोंगराचा काही भाग ढासळत असतो. हा मार्ग अरुंद असून या मार्गावर अनेक ठिकाणी मोठमोठे खड्डे पडले असून साईड पट्ट्यांची दुरावस्था झाली असल्याने रस्ता धोकादायक बनलेला आहे. घाटामध्ये तीव्र चढाला या मार्गावर अंदाजे अर्धा फुटाचे खड्डे पडले आहेत. या खड्डयांमुळे गाडीचा वेग अगदी कमी करून गाडी पुढे घ्यावी लागते. मात्र अशातच गाडीच्या प्रवासाची सलगता तुटल्याने गाडी मागे येऊन मोठा अपघात होण्याची शक्यता आहे. प्रशासनाला मात्र या रस्त्याचा विसर पडला असून या रस्त्याची अनेक वर्ष डागडुजी केली गेली नाही याकडे लक्ष घालून रस्त्याची लवकरात लवकर डागडुजी करण्यात यावी अशी मागणी गडदुदेवी देवस्थानचे भाविक व ग्रामस्थांनी केली आहे.

## उपसभापती नीलम गोऱ्हे यांचे शेतकऱ्यांनी मानले आभार



**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

शेतसारा अथवा महसुली देणे देऊ शकले नाहीत अशा शेतकऱ्यांच्या सरकारने जप्त केलेल्या जमिनी, ज्याला 'आकारी पड' जमिनी म्हणून गणल्या जातात. त्या पुन्हा संबंधित शेतकऱ्यांच्या नावावर करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला. या संदर्भात विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केलेल्या पाठपुराव्याबद्दल खेड तालुक्यातील शेतकऱ्यांनी त्यांना सन्मानीत केले. 14 नोव्हेंबर 2019 रोजी विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी संबंधित शेतकऱ्यांची बैठक घेऊन त्यांचे प्रश्न समजून घेतले होते. त्यानंतर 2019 पासून सातत्याने शेतकऱ्यांच्या या विषयांचा पाठपुरावा त्यांनी केला. त्यानंतर महाराष्ट्रातील सर्व शेतकऱ्यांसाठी आकारी पड जमिनींसंदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत त्यांनी शासनाकडे पाठपुरावा करून व निर्देश देऊन या शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे महत्त्वपूर्ण काम केले.

## खडकवासला ग्रामीण भागात भाजपा सभासद नोंदणी सुरु



**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला विधानसभा मतदारसंघातील पश्चिम हवेली तालुका भारतीय जनता पार्टीच्या सभासद नोंदणीचा शुभारंभ करण्यात आला.

पुणे जिल्हा अध्यक्ष वासुदेव नाना काळे यांच्या मार्गदर्शनाखाली पश्चिम हवेली अध्यक्ष , तसेच खडकवासला ग्रामीण अध्यक्ष नवनाथ तागुंदे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा सरचिटणीस जान्हवी बोरसे, पश्चिम हवेली उपाध्यक्ष दत्ताभाऊ पायगुडे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सभासद नोंदणी शुभारंभ करण्यात आला. यावेळी सुरेश निढाळकर, किरण तागुंदे, सोनाली तागुंदे, दिक्षा तागुंदे, नवनाथ ढमढेरे,शिवाजी तागुंदे, चंद्रकांत कानगुडे, दत्तात्रय तागुंदे,अक्षय तागुंदे, बाळासाहेब तागुंदे,बाळासाहेब कानगुडे, गौरी तागुंदे, कल्पना कानगुडे,श्रध्दा तागुंदे, गौरी रायकर ,इतर भाजपा कार्यकर्त्यांच्या उपस्थितीमध्ये खडकवाडी येथे सभासद नोंदणी उपक्रम शुभारंभ करण्यात आला. यावेळी बोलताना नवनाथ तागुंदे यांनी भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांच्या बळावर आपण विधानसभा निवडणुकीत ही माहिती चांगली कामगिरी केली आहे. आता जास्तीत जास्त सभासद नोंदणी करून आगामी काळात ग्रामीण भागातून जास्तीत जास्त कार्यकर्ते भारतीय जनता पार्टीशी जोडले जाणार आहेत. असे सांगितले

आ. भीमरावअण्णा तापकीर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून आगामी काळामध्ये ग्रामीण भागातून चांगला रिझल्ट आपल्याला पाहायला मिळणार आहे असाही विश्वास नवनाथ तागुंदे यांनी यावेळी व्यक्त केला. यावेळी कार्यकर्ते व महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ओडीसी इलेक्ट्रिकने झिप इलेक्ट्रिकला 1,500 हून अधिक ईव्ही स्कूटर्स वितरित केल्या

## भारतातील शाश्वत गतीशीलतेला अधिक दृढ केले



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

ओडीसी इलेक्ट्रिक या भारतातील दुचाकी इलेक्ट्रिक वेईकल (ईव्ही) ब्रँडने लास्ट-माइल डिलिव्हरी सेवांवर लक्ष केंद्रित असलेली प्रसिद्ध इलेक्ट्रिक वेईकल फ्लीट ऑपरेटर झिप इलेक्ट्रिकला यशस्वीपणे 1,500 हून अधिक इलेक्ट्रिक स्कूटर्स वितरित केल्याची घोषणा केली आहे. या महत्त्वपूर्ण टप्प्यामधून शाश्वत परिवहन सोल्यूशन्सची वाढती स्वीकृती, तसेच सर्वोत्तम, शुद्ध भविष्याप्रती योगदान देण्याचा दोन्ही कंपन्यांचा संयुक्त निर्धार दिसून येतो. यामध्ये 40,000 इलेक्ट्रिक वेईकल्ससाठी ऑर्डरचा देखील समावेश आहे, ज्या पुढील तीन वर्षांमध्ये ओडीसी इलेक्ट्रिककडून वितरित करण्यात येणार आहेत, ज्याची कंपनीने गेल्या महिन्यात घोषणा केली होती. या 1,500 हून अधिक ईव्ही स्कूटर्सच्या डिलिव्हरीसह ओडीसी इलेक्ट्रिक आणि झिप इलेक्ट्रिक यांच्यामधील शहरी परिवहनाच्या कार्बन परिणामाला कमी करण्याच्या संयुक्त उद्दीष्टासह सुरु झालेला सहयोग अधिक दृढ झाला आहे.

ओडीसी इलेक्ट्रिकचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. नेमिन वोरा म्हणाले, प्रत्येक स्कूटरची डिलिव्हरी होण्यासह आम्ही शाश्वत गतीशीलतेला वास्तविकतेत आणण्याच्या उद्दीष्टाच्या जवळ पोहोचत आहोत. आमचा विश्वास आहे की, इलेक्ट्रिक वेईकल्स भावी शहरी गतीशीलतेला सादर करतात आणि या सहयोगामधून भारतातील परिवहन वातावरणामध्ये हरित सोल्यूशन्ससाठी वाढती गरज दिसून येते. झिप इलेक्ट्रिकसोबतचा सहयोग अत्यंत समाधानकारक आहे आणि आम्हाला शाश्वत लास्ट-माइल डिलिव्हरी सोल्यूशन्स देण्याच्या त्यांच्या उद्देशाला पाठिंबा देत राहण्याचा आनंद होत आहे. 1,500 हून अधिक इलेक्ट्रिक स्कूटर्सचा हा पुरवठा फक्त सुरुवात आहे. आम्ही इलेक्ट्रिक वेईकल्ससाठी मागणी वाढण्यासह आमच्या प्रयत्नांना अधिक वाढवण्याची आशा करतो.

दोन्ही कंपन्या सहयोगाने भारतातील शाश्वत गतीशीलतेच्या भविष्याला आकार देत असताना या 1,500 हून अधिक इलेक्ट्रिक स्कूटर्सची डिलिव्हरी शहरी परिवहनाचे कार्बन फूटप्रिंट कमी करण्याप्रती आणि व्यवसाय व ग्राहकांसाठी पर्यावरणपूरक सोल्यूशन्सना चालना देण्याप्रती त्यांच्या संयुक्त प्रवासामधील महत्त्वपूर्ण टप्पा आहे.

2020 मध्ये स्थापना करण्यात आलेली ओडीसी इलेक्ट्रिक भारतातील इलेक्ट्रिक वेईकल लँडस्केपला नवीन आकार देण्यामध्ये अग्रस्थानी आहे. ओडीसी इलेक्ट्रिक सर्वात मोठा उत्पादन पोर्टफोलिओ देते, ज्यामध्ये 7 मॉडेल्सचा समावेश आहे, ज्यापैकी 2 लो-स्पीड स्कूटर्स, 2 हाय-स्पीड स्कूटर्स, बी2बी विभागावर लक्ष्य केलेली एक डिलिव्हरी स्कूटर, एक ईव्ही स्पोर्ट बाइक आणि दैनंदिन वापरकर्त्यांसाठी कम्यूटर बाइक आहे. उत्पादन श्रेणीमध्ये पुढील मॉडेल्सचा समावेश आहे:-

इलेक्ट्रिक मोटरसायकल वेडर (7 इंच टचस्क्रिन अँड्रॉईड डिस्प्ले, एआयएस-156 प्रमाणित बॅटरी, पाच ड्राइव्ह मोड्स, 18-लीटर स्टोरेज स्पेस, प्रबळ रचना)

इलेक्ट्रिक बाइक ईव्होकिस (चार ड्राइव्ह मोड्स, कीलेस एण्ट्री, अँण्टी-थेफ्ट लॉक आणि मोटर कट-ऑफ स्विच)

नवीन भर करण्यात आलेली हाय-स्पीड इलेक्ट्रिक स्कूटर स्नॅप (एआयएस 156 प्रमाणित स्मार्ट पोर्टेबल बॅटरी, वॉटरप्रूफ मोटर, डिस्टन्स टू एम्प्टी व सीएएन सक्षम डिस्प्ले)

हाय स्पीड इलेक्ट्रिक स्कूटर हॉक एलआय (क्रूझ कंट्रोल व म्युझिक सिस्टमसह पोर्टेबल बॅटरी असलेली भारतातील पहिली इलेक्ट्रिक स्कूटर)

लो-स्पीड - ई2गो लाइट, ई2गो+ आणि ई2गो ग्रॅफिन (पोर्टेबल बॅटरी, यूएसबी चार्जिंग, डिजिटल स्पीडोमीटर आणि कीलेस एण्ट्री असलेली इलेक्ट्रिक स्कूटर)

# थोडक्यात




## मावशी नंबर 1 चित्रपटाचा मुहूर्त उत्साहात

**पुणे (आरंभ पर्व) :** जयश्री फिल्म प्रोडक्शन कंपनीद्वारे मराठी चित्रपट मावशी नंबर 1 या चित्रपटाचा मुहूर्त प्रसिद्ध अभिनेते व शाहीर दादा पासलकर यांच्या शुभहस्ते श्रमिक पत्रकार भवन येथे मोठ्या उत्साहात पार पडला. याप्रसंगी नारायण सरदेसाई (अमेरिका) चित्रपटाचे निर्माते एम.एन.चव्हाण, लेखक - दिग्दर्शक - अशोक रत्नपारखी आणि चित्रपटातील कलाकार अभिनेते सुनिल गोडबोले, अरुण कदम, रोहित चव्हाण, शुभांगिनी देवकुळे, स्वाती कर्णेकर, राहुल मगदूम, अमोल नाईक संगीतकार अजय पराड तंत्रज्ञ आणि चित्रपट सृष्टीतील दिग्गज मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना पासलकर म्हणाले की मराठी चित्रपट सृष्टी मध्ये सध्या नाविन्यपूर्ण चित्रपटांची निर्मिती होत आहे . रसिक प्रेक्षकांचे मनोरंजन व प्रबोधन करण्यासाठी यावर्षी मावशी नंबर 1 हा चित्रपट रसिकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटाचा मुहूर्त माझ्या हस्ते पार पडला याचा मला विशेष आनंद आहे. त्याचबरोबर हा चित्रपट महाराष्ट्रातील रसिक प्रेक्षकांना खळखळून हसवेल आणि भरपूर मनोरंजन करेल. निर्माते एम.एन.चव्हाण म्हणाले की मावशी नंबर 1 हा चित्रपट वेगळ्या धाटणीचा असून या चित्रपटात मराठी आणि हिंदी भाषेतील दिग्गज कलाकारांचे फळी रसिकांना पाहायला मिळेल. या चित्रपटाचा मुहूर्त नुकताच पार पडला असून लवकरच या चित्रपटाचे चित्रीकरण निसर्गरम्य ठिकाणी करण्यात येणार आहे व याच वर्षी हा चित्रपट रसिकांना आपल्या जवळच्या चित्रपटगृहात पाहता येणार आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक लेखक - दिग्दर्शक अशोक रत्नपारखी यांनी केले तर आभार निर्माते एम.एन. चव्हाण यांनी मानले तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मधुरा टापरे यांनी केले.

## खरपुडीला लांडग्याच्या हल्ल्यात चार शेळ्यांचा मृत्यू

**राजगुरुनगर (आरंभ पर्व) :** खेड तालुक्याच्या पूर्व भागातील खरपुडी बुद्रुक येथे लांडग्यांच्या हल्ल्यात चार शेळ्या ठार झाल्या तसेच चार शेळ्या गंभीर जखमी झाल्या आहेत. सोमवारी (दि. 6) पहाटे ही घटना घडली. वन विभागाने लांडग्यांचा तातडीने बंदोबस्त करावा अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. खरपुडी परिसरात लांडग्याचा उपद्रव वाढला आहे. सोमवारी पहाटे खरपुडी दत्तनगर येथील शेतकरी उत्तम प्रभाकर काशिद यांच्या गोठ्यातील शेळ्यांवर लांडग्यांचा हल्ला झाला. या हल्ल्यात चार शेळ्या ठार झाल्या. तर चार शेळ्या गंभीर जखमी झाल्या आहेत. यामुळे काशिद यांचे मोठे नुकसान झाले. घटनास्थळी वन विभागाचे वनक्षेत्रपाल गुलाब मुरकुटे यांनी भेट देऊन पंचनामा केला. खरपुडी गावालगत दोन्ही बाजुला डोंगर असुन त्यावर दाट झाडी आहे. या परिसरात कोल्हे, लांडगे, तरस यांचा वावर आहे. डोंगर भागात खाद्याची व पाण्याची कमतरता भासू लागल्याने लांडग्यांचा मानवी वस्तीत वावर वाढला आहे. या भागात आठ ते दहा लांडग्यांची टोळी फिरत असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. लांडग्यांमुळे पाळीव प्राण्यांबरोबरच मानवी वस्त्यांनाही धोका निमार्ण झाला आहे. लांडग्यांचा वन विभागाने बंदोबस्त करावा, अशी मागणी रामनाथ होले व ग्रामस्थांनी केली आहे.

## पत्रकार समाजमनाचा आरसा

**इंदापूर (आरंभ पर्व) :** "पत्रकार हे समाजमनाचा आरसा असतात. त्यांनी जिथे चूक किंवा अन्याय होतो, तिथे जरूर लिहिले पाहिजे. मात्र जिथे चांगले काम होते तिथे कौतुक देखील केले पाहिजे. शहरात पत्रकार भवन होण्यासाठी तालुक्यातील पत्रकारांनी एक होणे ही काळाची गरज आहे," असे प्रतिपादन राज्याचे क्रीडा, युवक कल्याण व अल्पसंख्याक मंत्री नामदार दत्तात्रेय भरणे यांनी केले. इंदापूर तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित पत्रकार दिन कार्यक्रमप्रसंगी भरणे बोलत होते. यावेळी पत्रकार संघाच्या वतीने पत्रकार संघाच्या दैनंदिन कामासाठी इंदापूर बस स्थानकासमोरील सार्वजनिक बांधकाम विभागाची जुनी इमारत भाडे तत्त्वावर द्यावी, असे निवेदन भरणे यांना देण्यात आले. यावेळी माजी उपनगराध्यक्ष भरत शहा म्हणाले की, पत्रकारांचे शहर विकासासाठी महत्त्वपूर्ण कार्य असून नगरपरिषदेच्या मालकीचे सुसज्ज पत्रकार भवन बांधून दिले जाईल. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तालुका कार्याध्यक्ष महारुद्र पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सचिव इरफान कुरेशी, आयएमएचे इंदापूर तालुकाध्यक्ष डॉ. अनिल शिर्के यांनी मार्गदर्शन केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सरचिटणीस ॲड.राहुल मखरे, ॲड.शुभम निंबाळकर, किरण गानबोटे, पांडुरंग शिंदे, गफुर सय्यद, शकील सय्यद, धरमचंद लोढा, ॲड.गिरीष शहा, अमोलराजे इंगळे यांचेसह अन्य मान्यवर उपस्थित होते.यावेळी पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष डॉ. संदेश शहा, तानाजी काळे, महेश स्वामी, ॲड.नारायण ढावरे, कैलास पवार यांनी पत्रकारांच्या विविध अडचणीकडे लक्ष वेधले.

पूर्वी



आता



# नऱ्हे-गोकुळनगर मानाजी नगर परिसरातील खड्डे बुजवले

### भूपेंद्र मोरे यांच्या सूचनेनंतर मनपा प्रशासनाची कार्यवाही

**पुणे :लक्ष्मण साबळे (दै. आरंभ पर्व)**

नऱ्हे गोकुळ नगर मानाजी नगर परिसरातील रस्त्यावर असलेल्या वाहतुकीमुळे या भागातील रस्त्यावर खड्ड्याचे साम्राज्य निर्माण झाले आहे.

त्यामुळे छोटी मोठे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नव्हती.

ह्या भागातील रस्त्यावरील खड्डे बुजवण्यासाठी नऱ्हे भागातील सामाजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे यांनी प्रशासनाला सूचना केली होती. त्यानंतर पुणे महानगरपालिकेच्या विभागाकडून त्यांच्या सूचनाची दखल घेत या भागातील ह्या रस्त्यावरील खड्डे बुजवले.

रात्री मध्यरात्रीनंतर या भागातील रस्त्यावरील खड्डे बुजवण्यात आले.

यामुळे नागरिकाना खड्डे मुक्त रस्त्यातून प्रवास करणे शक्य होणार आहे.

शिवाय अपघात ही टाळले जाणार आहेत.मोरे यांच्या या कामाबद्दल परिसरातील नागरिकांनी त्यांचे विषयी कौतुक व्यक्त केले आहे.

नऱ्हे व परिसरातील सर्व रस्त्यांवर पडलेले खड्डे आणि त्यावर करावयाचे पॅचवर्क या दोन्ही कामे युध्द पातळीवर केली जात आहेत. पॅचवर्क हे डांबरी मालाच्या साहाय्याने बुजवण्यात आले. सदर ज्या रस्त्यांवर खड्डे पडलेले आहेत. अशा रस्त्यांवर रिसेंफेसिंगची कामे प्राधान्याने हाती घेण्यात आली आहेत,असे पथ विभागाकडून सांगण्यात आले.

पद्मश्री मणिभाई देसाई महाविद्यालयामध्ये 'मशरुम कल्टिवेशन'

## प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे उदघाटन



**उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)**

उरुळी कांचन येथील पद्मश्री मणिभाई देसाई महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र विभाग व क्वालिटी मशरुम फार्म धायरी पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या मशरुम कल्टिवेशन प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे उदघाटन क्वालिटी मशरुम फार्मच्या संस्थापिका व मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा.तृप्ती भूषण धकाते यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवाजी बोऱ्हाडे होते.

यावेळी महाविद्यालयाचे अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष प्रमुख प्रा.नंदकिशोर मेटे, प्रा.प्रतीक्षा कोद्रे, प्रा.वृषाली हिंगणे आदी उपस्थित होते.

# धायरीत भाजपा सभासद नोंदणीला चांगला प्रतिसाद

### भाजपा खडकवासला सरचिटणीस बाप्पूसाहेब पोकळे यांच्या वतीने शिबिराचे आयोजन

**धायरी : (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पार्टी कडून" संघटन पर्व" सभासद नोंदणी उपक्रम सुरू करण्यात आला आहे.

या अनुषंगाने खडकवासला विधानसभा मतदारसंघातील धायरी येथे सरचिटणीस बाप्पूसाहेब पोकळे यांच्यावतीने मतदार नोंदणी व भाजपा सभासद नोंदणी शिबिर सुरू करण्यात आले आहे. खडक चौक येथील पोकळे यांच्या कार्यालिय, रायकर मळा, धारेश्वर नगर ह्या विविध भागांमध्ये हे शिबिर घेण्यात आले. ह्यामध्ये 844 नागरिकांनी भाग घेत भारतीय जनता पार्टीचे सभासद झाले.



याशिवाय अनेक नागरिकांची मतदार नोंदणीही करण्यात आली. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून अनेक नागरिक भारतीय जनता पार्टीशी जोडले जात आहेत. आगामी काळातही ही नोंदणी आठवडाभर सुरू राहणार आहे. नागरिकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन भाजपा खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे सरचिटणीस बापूसाहेब पोकळे यांनी केले आहे.

या मतदार नोंदणी व भाजपा सभासद नोंदणी उपक्रमास भाजपा प्रभाग क्रमांक 42 अध्यक्ष तुषार पोकळे, बाप्पू शेठ तुकाराम पोकळे, भगवान गिरी, सागर पोकळे, सुहास पोकळे, ओमकार जाबरे, दादासाहेब भुरुक, ऋषिकेश पोकळे आदी मान्यवर उपस्थित होते.

अधिक माहितीसाठी : 9921242314,9881363263,9130707070 या क्रमांकावर संपर्क करावा असे आवाहन करण्यात आले आहे.

शिव वंदना मित्रपरिवार धायरी तर्फे आयोजित

# किल्ले स्पर्धेचे बक्षीस वितरण संपन्न

- व्यंकटसाई होंडा, travel Story,महेश थोरात,सांगाती संस्थेच्या सहकार्यातून स्पर्धा यशस्वी




**पुणे : लक्ष्मण साबळे (दै. आरंभ पर्व)**

हिंदुत्ववादी विचारासाठी प्रेरणादायी उपक्रम राबवणाऱ्या शिव वंदना मित्रपरिवार धायरीचा चांगला लौकिक धायरी व परिसरामध्ये आहे. संस्थापक प्राज भिलारे यांच्या संकल्पनेतून विविध उपक्रम राबवले जात आहेत. अशीच एक किल्ले स्पर्धा दरवर्षी शिव वंदना मित्र परिवाराच्या वतीने घेतली जाते. दहाव्या किल्ले स्पर्धेचे बक्षीस वितरण कार्यक्रम डीएसके विश्व येथे संपन्न झाला. खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे आमदार भीमराव तापकीर, युवा नेते किशोरभाऊ पोकळे, बापूसाहेब पोकळे, खडकवासला विधानसभा मतदारसंघ शिवसेना (उबाठा)अध्यक्ष नितीन वाघ, लेखक, विचारवंत तुषार दामगुडे, सामाजिक कार्यकर्ते महेश दादा रणदिवे, मारुती आबा गोळे, डॉ.नंदकुमार मते, रत्नाकर फाटक , आदी मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी साहसी कला, क्रीडा अविष्कारांचे सादरीकरण करण्यात आले.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारांचा हा महाराष्ट्र समर्थपणे घडला पाहिजे.

हिंदुत्ववादी विचार प्रत्येकाने आत्मसात करावा असे आवाहन उपस्थित मान्यवरांनी केले.

यावेळी किल्ले स्पर्धेत उपस्थित स्पर्धकासह, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यंदाचे स्पर्धेचे 10 वे वर्ष असून, एकूण 283 स्पर्धकांनी भाग घेतला. यामध्ये पुण्याबाहेरच्या व संपूर्ण महाराष्ट्रातील स्पर्धकांचा देखील समावेश होता.

## मॅक्डोनाल्ड्स इंडियाचे बारामतीत नवीन ड्राईव्ह-थ्रू रेस्टॉरंट सुरु

**बारामती (दै. आरंभ पर्व)**

मॅक्डोनाल्ड्स इंडियाचे (पश्चिम आणि दक्षिण) संचालन करणाऱ्या वेस्टलाईफ फूडवर्ल्ड लिमिटेडने आपल्या विस्तारासाठी बारामती या सदाबहार शहराची निवड केली आहे. यामुळे मॅक्डोनाल्ड्स रेस्टोरंटचे बारामतीत शहरात आगमन झाले असून या शहरासाठी हा एक मैलाचा दगड आहे. हे रेस्टॉरंट आधुनिक असे ड्राईव्ह थ्रू (डीटी) रेस्टॉरंट आहे. या ब्रँडच्या महाराष्ट्रभरातील 180 तर पश्चिम व दक्षिण भारतातील 400 ठिकाणी असलेल्या रेस्टॉरंट्सच्या वाढत्या नेटवर्कमध्ये भर पडली आहे. भविष्यातील अनुभव (एक्स्पीरियंस ऑफ दि फ्यूचर – ईओटीएफ) असे हे रेस्टॉरंट भिगवण रस्त्यावरील मोक्याच्या जागी आहे. यात शहर व परिसरातील 45 जणांना रोजगार मिळाला आहे. हे डीटी स्टोअर 14,000 चौ.




फुटांवर पसरले असून यात 130 अभ्यागतांसाठी आरामदायक बसण्याची तसेच सुविधाजनक कार पार्किंगची सुविधा आहे.

या रेस्टॉरंटमध्ये कंटेपररी भोजनाचा अनुभव मिळतो आणि डिजिटल सेल्फ ऑर्डरिंग किऑस्क , एक खास बच्चे कंपनी साठी वाढदिवस पार्टीचा एरिया आणि एक मॅककॅफे ( कॉफी पेय)हे त्याचे आकर्षण आहे. अभ्यागत येथे आपल्या आवडत्या मॅक्डोनाल्ड्स मेनूचा आनंद घेऊ शकतात, यामध्ये मॅकआलू टिक्की, मॅकवेजी, महाराजा मॅक आणि मॅकक्रिस्पी रेंज या सारक्या बहु विविध बर्गर्स चा समावेश आहे.

# सावित्रीबाई फुले जयंतीदिनी राष्ट्रसेवा समूहाच्या शिव-दिनदर्शिकेचे ग्रामस्थांच्या हस्ते प्रकाशन

**पुणे : लक्ष्मण साबळे (दै. आरंभ पर्व)**

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीदिनी राष्ट्रसेवा समूहाच्या शिव-दिनदर्शिकेचे प्रकाशन ग्रामस्थांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन राजमाता जिजाऊ महिला महासंघाच्या सर्व सदस्य यांच्यामार्फत करण्यात आले.तसेच यावेळी



सावित्री वंदना म्हणण्यात आली. राष्ट्रसेवा समूहाची शिवदिनदर्शिका ही यात महामानवांचे जयंती, पुण्यतिथी दिन,छत्रपती शिवरायांच्या बद्दलची विशेष माहिती व सर्व धार्मिक सणांची माहिती दिली जाते. याचे संपूर्ण भागात मोफत वितरण करण्यात येते. राष्ट्रसेवा समूह हा गेली 20 वर्षापासून संपूर्ण महाराष्ट्रात सामाजिक उपक्रमात अग्रेसर आहे. राष्ट्रसेवा समूहाचे संस्थापक अध्यक्ष राहुलभाऊ पोकळे यांच्या कुशल नेतृत्वाखाली राष्ट्र सेवा समूह आपले योगदान देत आहे.

आजच्या शिव दिनदर्शिका प्रकाशनानिम्मित राजमाता जिजाऊ महिला महासंघ अध्यक्षा स्मितातार्इ पोकळे, तसेच महिला महासंघाच्या पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते राष्ट्रसेवा समूह प्रवक्ते नवनाथ रायकर, रणजीत जोरे , अतुल पोकळे, कृष्णा पोकळे,राहुल जाधव, विजय रायकर, दादासाहेब पोकळे, तुषार कुंभार,श्रीकांत पोकळे, सचिन पातूरकर, प्रतिक जोरे, प्रसाद पोकळे, कृष्णा पोकळे, स्वप्निल पातूरकर, संजय गवळी, ॲड.बाळासाहेब अंबाड,तानाजी चिकने, शिवराज कौलगे, मारुती हनुमंते,सोनाली पोकळे,ज्योती कुंभार, रुपाली रायकर, भाग्यश्री काळे, प्रिया पातूरकर, निर्मला पोकळे, मीरा पोकळे, भारती पोकळे, राजश्री सांगळे, संगीता जोरे, सुजाता डोळस, अंकिता जाधव, गौरी कुंभार उपस्थित होत्या.

यावेळी कार्यक्रमाचे निवेदन व प्रास्ताविक नवनाथ रायकर,रणजीत जोरे ,प्रसाद पोकळे यांनी केले.

# काम करणाऱ्या महिलांसाठी पुणे देशातील पहिल्या पाच शहरांमध्ये

- अवतार ग्रुपच्या सर्वेक्षणात सामाजिक व औद्योगिक समावेशासाठी मिळाले स्थान
- काम करणाऱ्या महिलांसाठी सरकारी संस्थांची कार्यक्षमता आणि जीवनाची गुणवत्ता यासाठी उच्च मानांकन
- कौशल्य आणि रोजगार संधींसाठीही उच्च मानांकन



**पुणे (दै. आरंभ पर्व)** वैविध्य, समानता आणि समावेश (डीईआय) सोल्यूशन क्षेत्रातील भारतातील अग्रणी आणि भारतातील आघाडीची कार्यस्थळ संस्कृती सल्लागार कंपनी असलेल्या अवतार ग्रुपने आज आपल्या तिसऱ्या 'महिलांसाठी भारतातील सर्वश्रेष्ठ शहरे' (टॉप सिटीज फॉर वुमन इन इंडिया - टीसीडब्ल्यूआय) सर्वेक्षणाचे निकाल जाहीर केले. महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी आणि राज्यातील दुसरे सर्वांत मोठे शहर असलेल्या पुण्याला या सर्वेक्षणात पहिल्या पाच शहरांमध्ये मानाचे स्थान मिळाले आहे. काम करणाऱ्या महिलांच्या दृष्टीने सर्वाधिक समावेशक, सुरक्षित, सोयिस्कर आणि शाश्वत शहर म्हणून पुण्याला हा मान मिळाला आहे. काम करणाऱ्या महिलांसाठी सरकारी संस्थांची कार्यक्षमता आणि जीवनाची गुणवत्ता यासाठी उच्च मानांकन मिळवून पुण्याने या सर्वेक्षणात पाचवे स्थान मिळविले आहे.

'महिलांसाठी भारतातील सर्वश्रेष्ठ शहरे' निर्देशांक या सर्वेक्षणात आदर्श शहरे आणि सर्वोत्तम पद्धती निश्चित केल्या जातात. तसेच त्यात शहरांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी संस्था, धोरणकर्ते आणि व्यक्तींसाठी एक चौकट उपलब्ध करून दिली जाते. देशभरातील महिलांच्या प्रगतीसाठी ही एक प्रमुख चालक शक्ती आहे. 'अवतार'च्या प्राथमिक संशोधनासोबतच सेंटर फॉर मॉनिटरिंग द इंडियन इकॉनॉमी (सीएमआयई), जागतिक बँक, गुन्ह्यांच्या नोंदी आणि नियमित श्रमशक्ती सर्वेक्षणासह विविध डेटा स्रोतांना एकत्र करून हा निर्देशांक संकलित केला जातो. 'अवतार'च्या संशोधनात एफजीडी आणि एका देशव्यापी सर्वेक्षणाचा समावेश आहे. हे सर्वेक्षण फेब्रुवारी 2024 ते नोव्हेंबर 2024 या कालावधीत करण्यात आले. त्यामध्ये 60 शहरांतील 1672 महिलांनी भाग घेतला.

या सर्वेक्षणानुसार, बेंगळुरू, चेन्नई, मुंबई, हैदराबाद, पुणे, कोलकाता, अहमदाबाद, दिल्ली, गुरुग्राम आणि कोईम्बतूर ही 2024 मध्ये महिलांसाठी सर्वश्रेष्ठ दहा शहरे आहेत. याविषयी माहिती देताना पत्रकार परिषदेत बोलताना अवतार ग्रुपच्या संस्थापक-अध्यक्ष डॉ. सौंदर्या राजेश म्हणाल्या, "शहरे म्हणजे संधीचा पाया असतो. स्त्रिया कशा जगतील, काम करतील आणि भरभराट करतील हे शहरात ठरते. त्यामुळे, महिलांची प्रगती आणि समावेशकता वाढवण्यासाठी आपल्या शहरांची मुख्य तत्त्वे आणि सांस्कृतिक जडणघडण स्पष्टपणे समजून घेणे महत्त्वाचे असते. 'अवतार'चा वार्षिक 'महिलांसाठी भारतातील सर्वश्रेष्ठ शहरे' नेमके हेच काम करतो. त्यात डेटा-केंद्रित आणि पुरावा-आधारित दृष्टिकोनाचा वापर करण्यात येतो. आणि, 2047 पर्यंत विकसित भारताचे आपले स्वप्न साकार करण्यासाठी, आपल्याला भारतीय महिला व्यावसायिकांनी पुरुषांच्या बरोबरीने यशस्वी होणे गरजेचे आहे. जेव्हा शहरे खरोखरच लिंग-समावेशक होतील आणि महिलांच्या शक्तीला अनुकूल वातावरण देऊ शकतील, तेव्हाच हे शक्य आहे. महिलांना केवळ सुरक्षित रस्ते, सुलभ आरोग्यसेवा आणि शिक्षण आणि परवडणारी जीवनशैली देणे एवढाच याचा अर्थ नाही, ते मुख्यत्वे भरपाईचे उपाय आहेत. महिलांच्या आर्थिक यशासाठी स्पर्धात्मक क्षेत्र आणि व्यावसायिक नेते म्हणून त्यांना भरभराट करण्याच्या संधी देणेही महत्त्वाचे आहे. महिलांच्या नेतृत्वाखालील प्रकल्पांमध्ये गुंतवणूक करून महिलांच्या जीवन व करिअरला अनुकूल वातावरण निर्माण करूया."

> या सर्वेक्षणासाठी देशासाठी आर्थिक योगदानाच्या आधारे भारतातील १२० शहरांची निवड करण्यात आली. अवतारचे संशोधन आणि प्रचलित सरकारी माहितीनुसार, 'शहर समावेशन स्कोअर'च्या आधारे शहरांची क्रमवारी लावण्यात आली. या सर्वेक्षणाच्या विविध निकषांमध्ये, सरकारी कार्यक्षमतेमध्ये तिरुवनंतपुरम (८.१५) आणि पुणे (७.०६) यांना सर्वोच्च स्थान मिळाले. तसेच, जीवनाच्या गुणवत्तेच्या बाबतीतही पुण्याला (७.५०) कोईम्बतूर (७.५४) आणि चेन्नईच्या (७.०५) खालोखाल स्थान मिळाले.

## थोडक्यात




### शिक्षक सक्षमीकरण स्पर्धेत अश्विनी खुरंगळेचे यश

**उरुळी कांचन (आरंभ पर्व) :** पुणे जिल्हा परिषद आयोजित शिक्षक सक्षमीकरण स्पर्धा नुकत्याच कोयाळी पुनर्वसन शिक्रापूर येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. यामध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मळद येथील पदवीधर शिक्षिका अश्विनी खुरंगळे यांनी प्रश्नमंजुषा या स्पर्धेमध्ये दौंड तालुक्यातून प्रथम व जिल्हा स्तरावर द्वितीय क्रमांक मिळविला. या स्पर्धेत जिल्ह्यातून एकुण 4220 विविध प्रकारच्या शिक्षकांनी सहभाग घेतला होता. प्रत्येक तालुक्यातून प्रथम येणाऱ्या स्पर्धकांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली होती.या मध्ये मळद जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील पदवीधर शिक्षिका अश्विनी खुरंगळे यांनी प्रश्नमंजुषा या स्पर्धेमध्ये दौंड तालुक्यातून प्रथम क्रमांक व जिल्हा स्तरावर द्वितीय क्रमांक मिळवून तालुक्याचा गौरव वाढविला. या उत्कृष्ट कामगिरीबद्दल शिक्षणाधिकारी प्राथमिक संजय नाईकडे यांच्या हस्ते त्यांना गौरविण्यात आले.

# 'आग्रा अफेअर' या सीरिजमध्ये प्रेम, स्वप्न आणि प्रेमभंग यांचा संघर्ष पाहायला मिळणार

- ट्रेलर प्रदर्शित : 'आग्रा अफेअर' 8 जानेवारीपासून फक्त ॲमेझॉन एमएक्स प्लेअरवर मोफत स्ट्रीम होणार




**मुंबई (दै. आरंभ पर्व)** ॲमेझॉन एमएक्स प्लेअर, या ॲमेझॉनच्या मोफत व्हिडिओ स्ट्रीमिंग सर्व्हिसतर्फे नववर्षाचे उत्साहात स्वागत करण्यात आले असून डाइस मीडिया निर्मित आगामी 'आग्रा अफेअर' या रोमान्स-ड्रामा शैलीतील सीरिजची घोषणा करण्यात आली आहे. ॲमेझॉन एमएक्स प्लेअर या स्ट्रीमिंग सर्व्हिसतर्फे 'आग्रा अफेअर' या सीरिजचा उत्कंठावर्धक ट्रेलर सादर करण्यात आला असून, शाश्वत प्रेमासाठी ओळखल्या जाणाऱ्या आग्रा या शहरात घडणारी अपूर्ण राहिलेली प्रेमकथा आणि गमावलेल्या संधींची भावनिक कहाणी पाहायला मिळणार आहे. आकाश दहिया, हर्षिता गौर आणि चकोरी द्विवेदी इत्यादी उत्कृष्ट कलाकारांचा सहभाग असलेल्या या सीरिजचा आस्वाद प्रेक्षक 8 जानेवारीपासून ॲमेझॉन एमएक्स प्लेअरवर मोफत घेऊ शकतील.

ट्रेलरमध्ये आकाश आणि तन्वी यांच्यातील नात्याची झलक दिसते. आकाश हा एक हॉटेल व्यवसाय सुरु करण्याची स्वप्ने पाहणारा युवक आहे, तर तन्वी एक स्वतंत्र वृत्तीची टूर गाईड आहे. आग्रा येथे पर्यटकांसाठी रेस्टॉरंट सुरु करण्याच्या निमित्ताने हे दोघे एकत्र येतात. एकीकडे व्यावसायिक नातं अधिक घट्ट होत असताना, आकाश तन्वीच्या प्रेमात पडतो. मात्र, तन्वी त्याला प्रतिसाद देत नाही. आपल्या हसऱ्या चेहऱ्यामागे ती तिच्या आयुष्यातील गुंतागुंत लपवत राहते आणि त्या परिस्थितीशी एकटीने लढण्याचा प्रयत्न करत राहते. या सगळ्यामुळे आकाश व तन्वीच्या नात्याला चीर जाते. पण, आकाश तन्वीपासून दूर जाऊन साध्या-सरळ आणि दयाळू स्वभाव असलेल्या मेघाच्या प्रेमात पडतो, तेव्हा तन्वीला आकाशबद्दल वाटणाऱ्या भावना उमगायला लागतात. परिणामी, एक गुंतागुंतीचा प्रेमाचा त्रिकोण निर्माण होतो. 'आग्रा अफेअर' ही सीरिज शाश्वत प्रेमाची ओळख असलेल्या आग्रा या शहरात घडणाऱ्या प्रेम, महत्त्वाकांक्षा आणि स्वतःला शोधण्याच्या संघर्षाची कथा उलगडते. सीरिजबद्दल ॲमेझॉन एमएक्स प्लेअरचे हेड ऑफ कंटेंट अमोघ दुसाद म्हणाले, "'आग्रा अफेअर' या सीरिजमध्ये प्रेम आणि नात्यांची संकल्पना आगळ्या पद्धतीने मांडण्यात आली आहे. यात आधुनिक महत्त्वाकांक्षा आणि आग्रा येथील शाश्वत मोहकतेची सांगड घालण्यात आली आहे. कधी कधी लोकांच्या स्वप्नांचा त्यांच्या भावनांवर कसा प्रभाव पडतो, हे या सीरिजमध्ये उलगडण्यात आले आहे. ही वैयक्तिक आणि भावनिक प्रवासाची एक सुंदर कथा आहे." "आपल्या आयुष्याशी जवळच्या वाटणाऱ्या आणि हृदयाला हात घालणाऱ्या कथानकांची निर्मिती करण्यासाठी आम्ही डाइस मीडियामध्ये सतत प्रयत्नशील असतो आणि 'आग्रा अफेअर' ही त्याच दिशेने टाकलेले एक पाऊल आहे. ही आधुनिक प्रेमकथा भारतातील प्रेमभूमीमध्ये घडते, पुरुषासाठी आणि स्त्रीसाठी समाजाने नेमून दिलेल्या भूमिकांना आव्हान देते आणि आजच्या काळात प्रेम या भावनेबद्दलचा नवा दृष्टिकोन सादर करते. ही मालिका आग्रा या ठिकाणाचा शाश्वत वारसा नव्या रूपात सादर करते. या कथेच्या पार्श्वभूमीत आग्रा या शहराचे जिवंत रंग दिसून येतात. सामाजिक परंपरांना प्रश्न विचारत ही कथा वैयक्तिक प्रगती आणि महत्वाकांक्षेचे महत्त्व अधोरेखित करते.", असे डाइस मीडियाच्या ओटीटी पार्टनरशीप विभागाच्या असोसिएट व्हीपी जानकी अमृते म्हणाल्या.

आपल्या व्यक्तिरेखेबद्दल आकाश दहिया म्हणाला, "आकाश आपले प्रेम अत्यंत रांगड्या, संवेदनशील प्रकारे अनुभवतो. तो स्वप्नाळू आहे आणि आपल्या भावना व्यक्त करताना कचरत नाही.

प्रेमाचा शोध घेणे हे केवळ योग्य व्यक्ती शोधण्यापुरते मर्यादित नाही तर हा स्वतःचा शोध घेण्याचा प्रवास आहे. प्रेम, नकार आणि करिअर उभारण्याचा प्रयत्न करणाऱ्या आकाशची व्यक्तिरेखा जिवंत करणे, हा एक विलक्षण अनुभव होता. त्याची संवेदनशीलतेतून उभारी घेण्याची ताकद प्रेक्षकांना दिसावी आणि प्रेमभंग झाल्यावरही पुढे जाण्यासाठी केलेला त्याचा संघर्ष प्रेक्षकांना आपलासा वाटावा, ही माझी आशा आहे."

"तन्वी ही एक स्वतंत्र व्यक्ती आहे. तिला रोमान्सपेक्षा तिची स्वप्ने व करिअर जास्त महत्त्वाचे आहे. पण तिचा हा स्वतःला शोधण्याचा देखील प्रवास आहे. महत्त्वाकांक्षा आणि अनपेक्षित भावनांचे द्वंद्व तिच्या मनात सुरू आहे. तुम्हाला काय हवे आणि तुम्हाला काय वाटते यात संतुलन साधण्याचा प्रयत्न, हा सर्वांच्या परिचयाचा संघर्ष आहे. तन्वीची व्यक्तिरेखा जगताना या विसंगतीचा शोध घेता आला आणि या सीरिजमध्ये तिची व्यक्तिरेखा कशी विकसित होत जाते, हे प्रेक्षकांसमोर सादर करण्यास मी अत्यंत उत्सुक आहे.", असे या सीरिजमध्ये तन्वीची व्यक्तिरेखा साकारलेली हर्षिता गौर म्हणाली. 'आग्रा अफेअर' 8 जानेवारीपासून केवळ ॲमेझॉन एमएक्स प्लेअरवर स्ट्रीम होणार आहे. ॲमेझॉन एमएक्स प्लेअर मोबाइल ॲप, ॲमेझॉन शॉपिंग ॲप, प्राइम व्हिडिओ, फायर टीव्ही आणि कनेक्टेड टीव्हीवर उपलब्ध आहे.

# ओकाया ईव्हीचे नव्याने नामकरण, आता ओपीजी मोबिलिटी

- इलेक्ट्रिक वाहनांच्या वाढत्या पोर्टफोलिओसाठी नवीन दृश्यमान ओळख सादर
- दुचाकी आणि तिन चाकी वाहनांच्या श्रेणीसाठी आकर्षक नवीन लोगो आणि ब्रँड सौंदर्यशास्त्राची घोषणा, इलेक्ट्रिक मोबिलिटीच्या भविष्यातील क्रांतिकारी उडानाचे प्रतीक
- भारत मोबिलिटी ग्लोबल एक्स्पो 2025 मध्ये नवीन उत्पादन लाँच होणार असून, ओपीजी मोबिलिटी ब्रँडिंगसह पदार्पण करेल, त्यानंतर 2025 मध्ये टप्प्याटप्प्याने इतर उत्पादने सादर केली जातील.
- नवीन दृश्यमान ओळख 2025 पर्यंत 100+ नव्या शहरांमध्ये लागू केली जाईल.
- नवीन दृश्यमान ओळख आधुनिक ग्राहकांसाठी ब्रँडची वेगळी ओळख आणि मूल्य प्रस्ताव प्रभावीपणे दर्शवेल.




> **ओपीजी मोबिलिटी बद्दल**
>
> ओपीजी फ्युचर मोबिलिटी प्रायव्हेट लिमिटेड (पूर्वी ओकाया ईव्ही प्रायव्हेट लिमिटेड म्हणून ओळखले जात असे) शाश्वत मोबिलिटी उपायांची व्यापक श्रेणी प्रदान करते. यामध्ये हाय-स्पीड आणि लो-स्पीड इलेक्ट्रिक स्कूटर्स, प्रीमियम इलेक्ट्रिक स्पोर्ट्स बाईक, तसेच प्रवासी आणि मालवाहतूक तिपाहिया वाहने यांचा समावेश आहे. कंपनी ईव्ही चार्जिंग स्टेशन्स, ऊर्जा साठवण तसेच प्रगत बॅटरी सोल्यूशन्स देखील प्रदान करते, जे विश्वासार्हता आणि दीर्घकाळ टिकणाऱ्या कामगिरीची खात्री देतात. 40 वर्षांहून अधिक तांत्रिक कौशल्याच्या बळावर, ओपीजी मोबिलिटी भारताच्या हरित आणि शाश्वत भविष्यासाठी नाविन्यपूर्ण, टिकाऊ आणि परवडणाऱ्या मोबिलिटी उपायांची पूर्तता करण्यास पूर्णपणे सक्षम आहे.

**पुणे (दै. आरंभ पर्व)** भारतातील वाढत्या इलेक्ट्रिक मोबिलिटी बाजाराच्या गरजा पूर्ण करण्याच्या रणनीतिक प्रयत्नात, ओकाया ईव्ही ने आपल्या नवीन ब्रँड ओळखीची घोषणा केली असून, आता हा ब्रँड ओपीजी मोबिलिटी या नावाने ओळखला जाईल. हे पुर्नब्रँडिंग कंपनीच्या अत्याधुनिक डिझाईन, भविष्यकालीन तंत्रज्ञान आणि टिकाऊ व सुरक्षित उत्पादनांप्रती असलेल्या दृढ वचनबद्धतेचे प्रतीक आहे, जे भारतातील सतत बदलणाऱ्या ग्राहकांच्या गरजा पूर्ण करेल. वाढत्या मागणीच्या पूर्ततेसाठी, ओपीजी मोबिलिटी देशभरातील विस्तृत डीलर नेटवर्कचा लाभ घेणार आहे. ओपीजी मोबिलिटी दोन उप-ब्रँड्स अंतर्गत कार्य करेल. फेराटो हा प्रीमियम इलेक्ट्रिक मोटरसायकल आणि स्कूटर्ससाठी समर्पित असेल तर ऑटोपीजी हा प्रवासी आणि मालवाहतूक तिपाहिया वाहनांवर केंद्रित असेल.

भारत मोबिलिटी ग्लोबल एक्स्पो 2025 मध्ये ओपीजी मोबिलिटी आपल्या नवीन ब्रँडिंग अंतर्गत पहिले उत्पादन सादर करणार असून, आपल्या सुधारित इलेक्ट्रिक वाहनांची संपूर्ण श्रेणी देखील प्रदर्शित करणार आहे. यामध्ये विद्यमान मॉडेल्सच्या कार्यक्षमता सुधारित आवृत्त्यांचा समावेश असेल, ज्यामध्ये आता ओपीजी मोबिलिटी लोगो असणार आहे. बॅटरी आणि इलेक्ट्रॉनिक्स तंत्रज्ञानातील 40 वर्षांचा वारसा असलेल्या या कंपनीने भारताच्या इलेक्ट्रिक मोबिलिटी क्षेत्रात स्वतःला एक महत्त्वाचा खेळाडू म्हणून स्थापित केले आहे. कंपनीकडे हाय-स्पीड आणि लो-स्पीड इलेक्ट्रिक स्कूटर्स, प्रीमियम इलेक्ट्रिक बाईक तसेच प्रवासी आणि मालवाहतूक तिपाहिया वाहनांचा विस्तृत पोर्टफोलिओ आहे.

या रोमांचक घडामोडीवर भाष्य करताना ओपीजी मोबिलिटीचे व्यवस्थापकीय संचालक, श्री अंशुल गुप्ता म्हणाले : "बॅटरी आणि इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातील अनेक वर्षांच्या नेतृत्वानंतर, ओकाया ईव्ही वरून ओपीजी मोबिलिटीमध्ये रूपांतरित होण्याचा आम्हाला आनंद आहे. आम्ही संपूर्ण इलेक्ट्रिक वाहन उपाय प्रदान करणारा एक समग्र ब्रँड बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहोत.

हे पुर्नब्रँडिंग केवळ नाव बदलण्यापुरते मर्यादित नाही, तर भारतातील वेगाने विकसित होत असलेल्या ईव्ही बाजारात आघाडी कायम राखण्यासाठी एक रणनीतिक पाऊल आहे. आम्ही आधुनिक भारतीय ग्राहकांच्या गरजा समजून घेत आहोत, आणि ही नवीन ओळख आमच्या आधुनिक डिझाईन, प्रगत तंत्रज्ञान आणि ग्राहकप्रथम दृष्टिकोनाच्या बांधिलकीचे प्रतिबिंब आहे. आमचा नवीन लोगो आमची नवी ऊर्जा दर्शवितो आणि तरुण, तंत्रज्ञानी ग्राहकांशी अधिक जोडले जाण्याची आमची इच्छा देखिल व्यक्त करतो." श्री अंशुल पुढे म्हणाले, "भारत मोबिलिटी 2025 एक्स्पो ही आमच्या या नवीन दृष्टिकोनाचे अनावरण करण्यासाठी परिपूर्ण व्यासपीठ आहे. आम्ही ओपीजी मोबिलिटी ब्रँड अंतर्गत आमचे पहिले उत्पादन लाँच करू आणि संपूर्ण उत्पादन श्रेणीत ही दृश्यमान बदल प्रक्रिया लागू करू.

हा बदल प्रत्येक ग्राहक संपर्क बिंदूवर डिजिटल तसेच भौतिक स्वरूपात दिसून येईल, ज्यामुळे एकसंध आणि आकर्षक ब्रँड अनुभव सुनिश्चित केला जाईल."आपल्या नव्याने साकारलेल्या ओळखीच्या माध्यमातून, ओपीजी मोबिलिटी भारतीय सरकारच्या 'आत्मनिर्भर भारत' दृष्टिकोनाशी सुसंगत होत आहे. कंपनी भारतात निर्मित नव्या पिढीच्या इलेक्ट्रिक दुचाकी आणि तिपाहिया वाहनांच्या विकासावर भर देत आहे. ओपीजी मोबिलिटी दर्जेदार उत्पादने योग्य किमतीत उपलब्ध करून देण्यास वचनबद्ध आहे, ज्यामुळे मोठ्या ग्राहकवर्गाच्या गरजा पूर्ण करता येतील. यासोबतच, कंपनी भारतभर आपल्या सेवा आणि डीलरशिप नेटवर्कचा विस्तार करण्यावर लक्ष केंद्रित करत आहे. 2025 पर्यंत, ओपीजी मोबिलिटी देशभरातील सर्व प्रमुख शहरांपासून ते टियर-3 आणि टियर-4 लोकेशन्सपर्यंत प्रत्येक ग्राहकाला प्रीमियम सेवा उपलब्ध करून देण्याचा मानस ठेवते. ओपीजी मोबिलिटीच्या परिवर्तनाला ठळक दृश्यमान पुनर्रचना अधोरेखित करते, जी त्याच्या नवीन ओळखीचा पुनर्निर्माण दर्शविते.

नवीन लोगो आणि रंगसंगतीत काळा आणि हिरवा हे दोन प्रभावी रंग वापरण्यात आले आहेत, जे ब्रँडच्या मूलभूत मूल्यांचे प्रतीक आहेत. काळा रंग विश्वास आणि प्रगल्भतेचे प्रतिनिधित्व करतो, जो ब्रँडच्या विश्वासार्हता आणि नवकल्पनांप्रती असलेल्या बांधिलकीला अधोरेखित करतो. हिरवा रंग टिकावूपणाचे प्रतीक आहे, जो ओपीजी मोबिलिटीच्या पर्यावरणपूरक उपाय आणि हरित भविष्यासाठीच्या योगदानाची झलक दर्शवितो. हे दोन्ही रंग एकत्रितपणे सुसंवादी आणि गतिशील लोगो तयार करतात, जो अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि पर्यावरणीय जबाबदारी यांचे संगम दर्शवितो, तसेच ओपीजी मोबिलिटीच्या दूरदृष्टीला अधोरेखित करतो.

फेराटो : ओपीजी मोबिलिटीचे प्रीमियम दुचाकी विभाग आता "फेराटो" या ब्रँड अंतर्गत कार्य करेल. या पुर्नब्रँडिंगमध्ये सर्व विद्यमान स्कूटर मॉडेल्सचा समावेश असून, त्यात हाय-स्पीड स्कूटर्स जसे की फास्ट एफ 4, एफ 3, एफ 2 टी, एफ 2 एफ आणि एफ 2 बी, तसेच लो-स्पीड फ्रीडम एलआई यांचा समावेश आहे. याशिवाय, "डिस्रप्टर" स्पोर्ट्स बाईक देखील फेराटो लाइन-अपचा भाग असेल, ज्यामुळे नवीन ओपीजी मोबिलिटी ब्रँडिंग अंतर्गत संपूर्ण दुचाकी पोर्टफोलिओ पूर्ण होईल.

ओटीटीओपीजी : ओपीजी मोबिलिटीचे तिपाहिया वाहन विभाग, ओटीटीओपीजी, संपूर्ण देशभरातील विविध ग्राहकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी प्रवासी आणि मालवाहतूक इलेक्ट्रिक वाहनांची विस्तृत श्रेणी प्रदान करेल.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.